| | | |
|---|---|---|
| | **जनसंपर्क अधिकारी**<br>मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय<br>रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे<br>फोन नं. ०२२-२९४५१००१<br>Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in | |

**प्रेसनोट क्रमांक :- ७६-२३** **दिनांक :- ०४/०३/२०२३**

# परदेशात नोकरी मिळवुन देण्याची बतावणी करुन फसवणुक करणा-या दोन आरोपीतांना अटक - काशिमिरा पोलीस ठाणेची कामगिरी.

दिनांक २१/०२/२०२३ रोजी महिला फिर्यादी, रा. मिरारोड पुर्व, ता.जि. ठाणे हिने समक्ष काशिमीरा पोलीस ठाणेत येवुन सांगितले की आरोपीत नामे १) अशरफ मैदु कैवौरा, वय ४६ वर्षे रा. चैट्टली पोष्ट सोमवार पेठ तालुका चेराळा, श्रीमंगळा, चैट्टाली, कोडागु, कर्नाटक व महिला नामे २) नमीता सुनिल मालुसरे, वय ४६ वर्षे रा. हनुमान मंदीर जवळ, एम. बी.जाधव चाळ, रुम क्र. ०३/बी, जव्हारभाई प्लॉट, घाटकोपर पश्चिम, मुंबई यांनी तिस ओमान-मस्कत देशात घरकामाचा दरमहा ३०,०००/- रु. पगार देवून जॉब देतो असे सांगितले होते. त्यानुसार फिर्यादी ओमान-मस्कत देशात कामास गेल्यानंतर तिला तेथील ओमानी एंजन्ट यांनी भारतातील एंजन्टनी ३ लाख रुपयास विकले असून ते जे काही काम सांगतील ते तिस करावे लागेल. तसेच परत भारतात जायचे असले तर त्यांनी दिलेले ३ लाख रुपये परत करावे लागतील असे सांगितल्याने फिर्यादी हिने ओमान मस्कत येथील तिचे ओळखीचे व्यक्तीना सदरची घटना सांगुन त्यांचेकडुन पैश्याची मदत घेवुन सुमारे १,६५,०००/-रुपये ओमानी देशातील एंजन्टला देवुन स्वतःची सुटका करुन घेवुन भारतात परत आल्याबाबत माहिती दिल्याने वर नमूद आरोपीतांविरुध्द काशिमीरा पोलीस ठाणेत गुन्हा नोद क्रमांक I १३२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७०, ४२०, ३४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हा उघडकीस आणण्याबाबत वरिष्ठांनी दिलेल्या सूचना व मार्गदर्शनाप्रमाणे काशिमीरा पोलीस ठाण्यातील अधिकारी व अंमलदार यांनी प्राप्त तांत्रिक माहितीचे आधारे सदर गुन्हयातील वर नमुद आरोपीतांना दिनांक ०१/०३/२०२३ रोजी अटक केली आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास काशिमीरा पोलीस ठाणेचे पोलीस उप निरीक्षक श्री. सूरज जगताप हे करीत आहेत.

सदरची कामगिरी श्री. जंयत बजबळे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ १, श्री. विलास सानप, सहायक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांचे मार्गदर्शनाखाली काशिमीरा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. संदिप कदम, पो. उप. निरी सुरज जगताप, स.फौ. लक्ष्मण पाटील, पो.हवा. इरफान मुलानी, तसेच काशिमीरा पोलीस ठाणेचे गुन्हे प्रकटिकरण शाखेचे पो.हवा. दिपक वारे, सुधीर खोत यांनी केली आहे.



-----ooooo-----